Impact Factor
5.307 (SJIF)

RESEARCH HUB
International Peer-Reviewed Multidisciplinary E-Journal

ISSN
2582-9173

# पूर्व विदर्भातील गोंधळ लोकनाट्याचे स्वरूप – एक आकलन

**डॉ. शरद जे. मेश्राम**
शिवप्रसाद सदानंद जायस्वाल महाविद्यालय
अर्जुनी मोरगाव जि. गोंदिया
9404279799
sweetsharad123@gmail.com

**प्रस्तावना :**

गोंधळ हा महाराष्ट्रातील प्रयोगरूप कलाप्रकाराचा एक महत्त्वाचा अतिप्रसिद्ध असा लोकनाट्य प्रकार आहे. महाराष्ट्राच्या लोकधर्मात आणि देवकर्मात गोंधळ हा अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण असा नाट्यरूप धार्मिक विधी आहे. गोंधळ हा रात्रभर चालणारा देवीच्या कुळाचाराचा विधी आहे. गोंधळ हे एक विधिनाट्य असून कुलाचार म्हणून तो महाराष्ट्र, कर्नाटक, इ. राज्यात पाळला जातो. लग्न, मुंज इ. मंगलकार्याच्या निमित्ताने यजमानांच्या घरी जाऊन गोंधळी भवानी, अंबाबाई इ. मातृदेवतांच्या नावाने हे आराधना नाट्य सादर करतात. मातृदेवतेचा विधी करणे हाच या आराधनेमागील प्रमुख हेतू आहे. संगीत, नृत्य आणि नाट्याच्या आधारे विधिनाट्याला प्रयोगरूप प्राप्त होते.

गोंधळ हे अतिशय प्राचीन आणि मोठी परंपरा लाभलेले असे लोकनाट्य आहे. या लोकनाट्याचे प्राचीनत्व हे इतर कोणत्याही लोकनाट्यापेक्षा अधिक असल्याचे दिसते. 'गोंधळ' घालणाऱ्या 'गोंधळी' लोकांचा एक स्वतंत्र समाजच महाराष्ट्रात पूर्वीपासून अस्तित्वात आहे. गोंधळामध्ये पौराणिक घटना प्रसंगावर आधारित कथागीत गायले जाते. गोंधळाची ही परंपरा साधारण किती प्राचीन आहे याचा सबळ पुरावा मिळत नसला तरी अनेक अभ्यासकांनी ते शोधण्याचा प्रयत्न केलेला आहे. "गोंधळ हा विधी कुलाचार म्हणून कधी रूढ झाला ते सांगणे अवघड असले तरी अभ्यासकांच्या मते तुळजापूर भवानीची प्राचीनता इ.स. १००० पूर्वीपर्यंत जाते आणि माहूरची रेणुका ही तर तिच्यापेक्षाही प्राचीन आहे. या देवता जितक्या प्राचीन तितकाच गोंधळही प्राचीन आहे."[१]

ज्या विविध माध्यमांतून पारंपरिक लोकजीवन आविष्कृत होते त्या माध्यमांचा समावेश लोकसाहित्यात होत असतो. परंपरेने चालत आलेल्या विविध लोककला हे लोकजीवन आविष्काराचे सांस्कृतिक माध्यम आहे. या विविध लोककलांच्या निर्मितीमागे अनेकविध प्रेरणा असतात. यात अद्‌भुताची प्रेरणा, देवाधर्माची प्रेरणा, कौटुंबिक किंवा प्रापंचिक प्रेरणा, सामाजिक प्रेरणा अशा प्रकारची वर्गवारी केलेली आढळते. गोंधळी, पोतराज, वासुदेव, वाघ्या मुरळी, भराडी यासारख्या लोककलावंतांनी व लोकसंस्कृतीच्या उपासकांनी मराठी लोकसंस्कृतीची धारा अखंडपणे प्रवाही ठेवली आहे.

लोकजीवनात प्रचलित असलेल्या या लोकरंगाविष्काराचा, लोकधर्मी नाट्याचा उगम प्राचीन काळातील विधी आचरणातून झालेला आहे. ईश्वरविषयक श्रद्धाभावना, धर्मकल्पना आणि सर्जक जाणीव विविध कलाविष्कारास प्रवृत्त करीत असतात. लोककलाविष्कार हे मौखिक परंपरेने चालत आलेली लोकसाहित्याची अंगे आहेत. महाराष्ट्राच्या लोकधर्मात आणि देवकर्मात गोंधळ कुलाचाराची प्रतिष्ठा प्राप्त झालेला असा एक नाट्यरूप विधी आहे.

Research Hub International Journal

**गोंधळाचे स्वरूप :**

महाराष्ट्रातील काही घराण्यांमध्ये आजही लग्न, मुंज किंवा देवीच्या उपासनेप्रसंगी गोंधळ सादर करण्याची प्रथा मोठ्या प्रमाणात प्रचलित आहे. घरातील मंगलकार्य निर्विघ्नपणे पार पाडल्याबद्दल अंबाबाई, भवानी, रेणुका, यासारख्या कुलदेवीच्या उपकार स्मरणाचा हा विधी असतो. अशा मंगलप्रसंगी गोंधळ्यांना सन्मानपूर्वक बोलावून 'गोंधळ' घातला जातो.

" गोंधळ हा विधिसापेक्ष असल्यामुळे त्यातून घडणारा एकूणच कलात्मक आविष्कार हा विधिसापेक्ष ठरतो. विधी – विधीची मांडणी आणि विधिआचरण असे स्वरूप गोंधळाचे असते. त्यामुळे गोंधळाला विधीचे आणि कलात्मक आविष्काराचे म्हणजे नाट्याचे संदर्भ लाभतात. त्यामुळेच 'गोंधळ' हा विधिनाट्याचा प्रयोग ठरतो. विधिनाट्याच्या परंपरेचा मागोवा घेतांना आर्यांच्या यज्ञविधीपर्यंत आणि त्याहीपूर्वी आपल्याला विधिनाट्याचे अवशेष पाहता येतात. विधीच्या निमित्ताने पूजामांडणी आणि विधिआचरणाचा एक भाग म्हणून गोंधळातून कलात्मक आविष्कार घडविणे असे स्वरूप गोंधळाचे असल्यामुळे देवीचा पूजाविधी हा गोंधळाचाच एक भाग ठरतो."[२]

प्रारंभीच्या काळामध्ये गोंधळाचे स्वरूप ईश्वर स्तुतीपर होते. कालांतराने त्याचे स्वरूप पालटत जाऊन देवीस्तवनपर आणि पुढे त्यात वीर पुरूषांचे पोवाडे म्हणणे, नकला करणे इत्यादी स्वरूपाचा विनोदी भागही येऊ लागला. अतिशय प्राचीन काळापासून आपले अस्तित्व टिकवून असलेले गोंधळ हे लोकनाट्य विविध बदल आणि प्रवाह स्वीकारित आजही टिकून असल्याचे दिसते.

गोंधळ्यांची वेशभूषा वैशिष्ट्यपूर्ण असते. गोंधळाचा कुलाचार पार पाडताना तो जो पोषाख करतो त्याला 'बाना' असे म्हणतात. गोंधळ्याच्या बान्यात कवड्यांच्या माळेला विशेष महत्त्व असते. रेणुराई गोंधळी, गोंधळ सादर करतांना डोक्यावर कंगणीदार मराठेशाही पगडी घालतात तर कदमराई म्हणजे तुळजाभवानीचे गोंधळी डोक्यावर कवड्यांची उंच टोपी घालतात. गळ्यात चौसष्ट कवड्यांची माळ असते. प्रमुख गोंधळी एक वैशिष्ट्यपूर्ण शिवणीचा पायघोळ अंगरखा घालतो. त्याला साधारण पंचवीस ते तीस मीटर कापड लागत असते. गोंधळ्याच्या गळ्यातील कवड्यांच्या माळेतील कवडी हे देवाने मारलेल्या दैत्यांच्या शिरांचे प्रतीक असते असे समजले जाते.

पूर्व विदर्भाच्या प्रदेशातही गोंधळ हे लोकनाट्य फार प्रचलित आहे. अनेक लहान मोठ्या धार्मिक विधीप्रसंगी गोंधळ पाहायला मिळतो. कालौघात त्याचे स्वरूप बदलत चालले आहे. तसेच त्याच्या आयोजनाच्या मागची प्रवृत्ती सुद्धा बदलत चालली आहे. या परिसरात आढळणाऱ्या या गोंधळामध्येही पूजाविधीचा भाग आहे. मात्र त्याचे स्वरूप काहीसे वेगळे असल्याचे दिसते. "गोंधळाची मांडणी करतांना गोंधळी एका पाटावर नवे वस्त्र अंथरून त्यावर तांदळाचा चौक करतो. चौकाच्या चार कोपऱ्यावर चार व मध्ये एक याप्रमाणे खोबऱ्याच्या वाट्या, शेजारी सुपाऱ्या, खारका, हळकुंडे व केळी या वस्तू मांडतो. चौकाच्या मध्ये कलशाची स्थापना करून त्यावर विड्याची किंवा आंब्याची पाने ठेवून त्यावर एक नारळ ठेवतो. मग यजमान देवीची स्थापना व पूजा करतो. पाटाभोवती ज्वारीच्या धांड्याची गुढी उभी करतो. त्याला कडकण्या टांगतो. मधोमध घटमाळ बांधून ती कलशावरील नारळावर सोडतो. बाजूलाच दिवटी पेटवून ठेवतात नंतर गोंधळ्याच्या मार्गदर्शनाखाली घरातील पती पत्नी अथवा लग्न झालेले नवीन दाम्पत्य ही पूजा करतात."[३]



Research Hub International Journal

गोंधळाच्या कुलाचाराच्या या पूजाविधीनंतर प्रत्यक्ष गोंधळाला सुरूवात होते. पारंपरिक वेशभूषेतील गोंधळी संबळ, तुणतुणे, झांज, डमरू, कडी या वाद्यांच्या संगीत साथीसह गोंधळाला आरंभ करतात. गोंधळाच्या प्रयोगाचे पूर्वरंग आणि उत्तररंग असे दोन भाग पडतात. पूर्वरंगात लोकरंगभूमी 'भार'ली जाते तर उत्तररंगात हा 'भार' उतरविला जातो.

**पूर्वरंग :**

गोंधळ सुरू झाल्यानंतर पूजाविधी आटोपल्यावर खऱ्या अर्थाने पूर्वरंगास सुरूवात होते. पारंपरिक वेशभूषेतील गोंधळी आपल्या वाद्यांसह गोंधळाला उभे राहतात. पूर्वरंगात देवतेची प्रतिष्ठापना, पूजा, देवता आवाहन, देवता अवतरण आणि संकीर्तन किंवा देवता गुणगान असते. पुढे मुख्य गोंधळी कथा निरूपण करतो. त्याला 'नाईक' असे म्हणतात. संगीत, अभिनय, नृत्य, नाट्य, विनोद यामुळे गोंधळी लोक समोर बसलेल्या प्रेक्षक वर्गाची मने जिंकून घेतात.

**१. गण :**

गोंधळाच्या पूर्वरंगात सुरूवातीला गण सादर केला जातो. या गणातून गणेशाचे स्तवन केले जाते. मुख्य गोंधळी गण गातो व त्याचे साथीदार त्याला गाण्यात, संगीतात साथ करतात. मधून मधून गोंधळी नृत्यही करतो. " गणाची स्तुती किंवा स्तोत्रे म्हणजे संपूर्ण ज्ञात अज्ञात सृष्टीचीच स्तुती होय. गण गाण्याची प्रथा किंवा या प्रथेचा उगम अतिशय प्राचीन असावा. 'भक्ती' करणारे जे 'दल' किंवा 'गण' गाणारे जे दल त्यावरून गण. दल त्र गोंधळ, अशी संज्ञा प्राप्त झाली असावी."[४]

पूर्व विदर्भात गोंधळ या लोकनाट्य प्रकाराला फार प्रसिद्धी असल्याचे दिसते. भंडारा जिल्ह्यात गोंधळाच्या प्रयोगात सादर होणारा एक गण पाहू.

" असे गण गुरूच्या चरणा
असे नेमला नेमला देव सद्गुरू
शिरी मुकूट, पिवरा पितांबर
बसले बिंदरा बनी
अवर लाविता लाविता
कुंडल कानी
चार जनता चार भूजा
जनत कशाला केला
तो लबलबा लबलबा
हालवे मान
सुज हरवली बुज हरवली
तेवा नेमिला
गण गण हा गवरी
गवरीचा नंदन"

Research Hub International Journal

पूर्व विदर्भातील बोली ही झाडीबोली असल्याने या परिसरात सादर होणाऱ्या लोकनाट्यांच्या कथागीतांमध्ये या झाडीबोलीचाच वापर होत असतांना दिसून येतो.



**भंडारा जिल्ह्यातील लाखनी तालुक्यातील गोंदी देवरी येथील शाहीर परसराम मेश्राम आणि त्यांचा पूर्ण गोंधळ संच. या भागात हे संच अतिशय प्रसिद्ध असून दरवर्षी ते साधारण ३५ ते ४० प्रयोग सादर करीत असतात.**

याप्रमाणे गोंधळी विविध देवदेवतांना गोंधळास येण्याचे आवाहन करतो. त्याच्या या आवाहनातून या देवदेवता गोंधळाच्या स्थळी अवतरतात अशी लोकश्रद्धा आणि रंगभूमीवर प्रत्यक्ष देवदेवता अवतरतात व त्यांच्या साक्षीने गोंधळाचा प्रयोग होतो असा भक्तीभाव येथे दिसतो.

**२. देवता स्तवन :**

सुरूवातीला गण गायल्यानंतर जगदंबेचे स्तवन करून अनेक देवदेवतांना गोंधळासाठी पाचारण केले जाते. त्यापैकी एक स्तवन पाहू.

" आदि नमिला गणपती
मग नमा हो, सारजा नाम सरस्वती,
जगात माया, ब्रम्ह— विष्णु करतीय छाया,
नाव तुळजापूरची भवानी
सारजा, सरस्वतीचे नमन"

गोंधळाच्या प्रयोगाचे, नाट्यप्रयोगाच्या दृष्टीने विचार करता गोंधळातील पूजाविधी हा रंगभूमीचाच पूजाविधी ठरतो. रंगदेवतेच्या पूजाविधीचे मूळ या स्वरूपाच्या विधीनाट्यात असल्याचे दिसते. " गोंधळ हा विधिसापेक्ष असल्यामुळे आणि विधिआचरणाच्या प्रसंगी देवदेवता गोंधळाला उपस्थित राहत असल्याचे गृहित धरल्यामुळे गोंधळाचा प्रेक्षक केवळ दर्शक म्हणून राहत नाही, तर तो भक्त म्हणून, भाविक म्हणून गोंधळाच्या प्रयोगात सहभागी झालेला असतो. घराण्याचा कुलाचार म्हणून गोंधळ करविणारे यजमान, त्यांचे कुटुंबीय, गोंधळ ज्यांच्या द्वारा करावयाचा ते गोंधळी आणि 'गोंधळ' अनुभवण्यासाठी एकत्र आलेले प्रेक्षक हे सर्वच घटक श्रद्धेच्या पातळीवर वावरतात."[५]

Research Hub International Journal

गण आणि देवतास्तवनानंतर देवदेवतांचे संकीर्तन, गुणगान गोंधळी करतो. त्याला 'वंदन' असेही म्हटले जाते. यात तुळजापूरची भवानी आई, माहुरची रेणुका माता यांच्या पराक्रमांची, त्यांच्या रूप – गुणांची लौकिक पातळीवरची वर्णने असतात. अलौकिक पातळीवरच्या या देवतांना लौकिक पातळीवर आणण्याची किमया गोंधळी आपल्या गीतांतून करतो. यामुळे एक प्रकारचा आपणभाव निर्माण होऊन संपूर्ण गोंधळाच्या प्रयोगात आपलेपणा प्रत्ययास येतो.

अलौकिक पातळीवरच्या देवदेवता जणू आपल्यापैकीच एक आहेत अशा आपलेपणाच्या भावातून केलेले हे चित्रण मनाला भावून जाते. माहुरच्या रेणुकामातेचे, तिच्या पराक्रमाचे वर्णनही बघण्यासारखे आहे.

" आई जगदंबा रेणुका सुंदरी
नांदती माहुरगडी
धरातरी गांजली दैत्यानं
बुडती अवघंजन
निघाली माया त्या होमातूनी
महिसासूर मर्दिला तिनं
तवां देवाशी झालं सुख, सरगातून ।।"

अशा विविध गीतांना अभिनयासह सादर करून गोंधळी देवतांचे लीला कथन करतो. नृत्य, संगीताची साथ त्या गीतांना लाभलेली असल्यामुळे त्यामध्ये नाट्यात्मकता येते. अशाप्रकारे देवतांना आवाहन करतांना गोंधळी ज्या प्रदेशातील असेल तेथील स्थानिक देवदेवतांना गोंधळाला येण्याची विनंती करीत असतो. असे हे देवतांचे स्तवन म्हणजे देवीची माहात्म्यपर, स्तुतीपर भक्तिगीतेच असतात. मात्र त्यात एक आगळावेगळा आपलेपणा भरलेला दिसून येतो.

**३. गौळण :**

पूर्वरंगात मंडळ पूजेपासून गणदेवतेची पूजा, कुलदेवतेची पूजा, वेगवेगळ्या देवतांना आवाहन केल्यानंतर गोंधळाची मूळ देवतांची स्तुतीस्तोत्रे गायीली जातात. त्यानंतर मनोरंजनपर गाणी, देवताविषयक लावणी, कृष्णकथा गुंफणाऱ्या गौळणी सादर केल्या जातात. " गोंधळी गोंधळात 'गवळणी' हा गीतप्रकार उपयोगात आणतात. कधी स्तवन म्हणून तर कधी भक्तीचे निरूपण करून, कधी रूपक म्हणून विशेष करून मनोरंजनार्थ 'गवळण' म्हणण्याची गोंधळ्यांची पद्धत आहे."[६] अशाच एका गौळणीचे एक उदाहरण पाहू.

" नवरी जशी नटलेली, कृष्णाला पटलेली।
अहो, वेणी तुझी सुटलेली, घागर तुझी फुटलेली।
या चांदण्या रात्री, राधे तू कुठून आली।
गोऱ्या गोऱ्या गाली, तू कुठून आली।
कृष्णाला भेटून आली, कृष्णाला पटून आली।
कृष्णाला पाहून झाली का गं वेडी।
पहिल्या पहिल्या भेटीत, रंगली का गं साडी।।"

गोंधळ्याच्या गौळणी अशा विविध कल्पनाचातुर्याने नटलेल्या आहेत. शब्दांचे सामर्थ्य थेट प्रेक्षकांच्या हृदयाला जाऊन भिडणारे आहेत. त्याची खरी मजा प्रत्यक्ष गोंधळ पाहून त्यांच्या तोंडून ऐकण्यात आहे.

Research Hub International Journal

**उत्तररंग :**

गोंधळातील पुढील भाग म्हणजे उत्तररंगाला सुरूवात होते. 'गोंधळ' या विधिनाट्यात खऱ्या अर्थाने नाट्य खुलते, नाट्य विकसित होते ते उत्तररंगातच. कथागीत सादर करतांना नृत्य, नाट्य, संगीत यांची साथ या सादरीकरणाला असते. लोकजीवनातील जिव्हाळ्याचे, श्रद्धेचे आणि लोकमनाला भावणारे असेच पौराणिक कथागीत गोंधळी सादर करतो. हे कथागीत म्हणजे गोंधळाच्या प्रयोगाची अलिखित नाट्यसंहिता असते. या स्वरूपाची कथागीते गोंधळ्यांच्या घराण्यात परंपरेने चालत आलेली असतात."[७] पौराणिक घटनांवर आधारित असलेल्या काळाचंपा, गोराचंपा, गुलबकावली, सत्य विजयाची कथा, डोरलीची कथा, लीलावतीची कथा, राजा हरिश्चंद्राची कथा इत्यादी विविध कथा लोकांची आवडनिवड लक्षात घेऊन सादर केल्या जातात.

उत्तररंगात सादर होणाऱ्या या कथेचे स्वरूप कथागीतात्मक गद्यपद्यमिश्रित असते. गोंधळातील कथा, निवेदन शैली, नाट्य, संवाद या दृष्टीने गोंधळाच्या कथागीतांचे सादरीकरण पाहण्यासारखे असते.

" गोंधळ्यांनी या कलेची जोपासना मौखिक परंपरेनेच केली आहे. गोंधळ्याच्या अंगी असणारा नाट्याभिनयाचा गुण, शीघ्रकवित्व, संगीत, नृत्य, निवेदन शैली, संवाद यांच्या साथीने ज्यावेळी गोंधळी कथेचे सादरीकरण करतो त्यावेळी श्रोते तल्लीन होऊन जातात. कथा सुरू असतांना गोंधळामध्ये ताजेपणा ठेवण्यासाठी विनोदी गाणे, शाब्दिक कोट्या, विनोद निर्मितीसाठी सादर करतात. या विनोदाचे स्वरूप प्रसन्न, मिश्किल आणि सात्विक असते."[८]

गोंधळाची नाट्यसंहिता ही अलिखित असल्याने पिढीदर पिढीप्रमाणे त्यात थोडा थोडा बदल घडून येत असतो. गोंधळामध्ये ही कथागीते सादर होत असतांना त्यातील कलावंत उत्स्फूर्तपणे असा थोडाफार बदल स्वत: घडवून आणतांना दिसतात. अशा उत्स्फूर्ततेमुळे आणि कलावंतांच्या हाजरजबाबीपणामुळे गोंधळाचा प्रत्येक प्रयोग हा नवा प्रयोग ठरत असतो. साधारणपणे रात्रभर चालणाऱ्या या प्रयोगाला सादर करणारे कलावंत आणि उपस्थित असलेले प्रेक्षकवर्ग कंटाळत नाहीत याला कारण या प्रयोगातील लोकधर्मीयता हे होय. गोंधळातून सादर केली जाणारी कथागीते लोकजीवनाला आपली वाटणारी अशीच असतात. पुराण, कीर्तन यातून लोकांना त्याचा परिचय झालेला असतो पण गोंधळी जेव्हा अशी पारंपरिक कथागीते सादर करतात तेव्हा त्यांना लौकिकाची डूब दिला जाते.

गोंधळी मुख्य कथागीतास खुमासदार, औचित्यपूर्ण आणि दैनंदिन जीवनातील अनुभवावर आधारित अशा संवादाची जोड देऊन गोंधळात अधिक रंग भरीत असतो. त्यामुळे कथागीतामध्ये एक वेगळेपणा येतो. " गोंधळाच्या कथानकात वीररसपूर्ण अशा देवदेवतांच्या वाटणाऱ्या शौर्याचा समावेश असतो. प्रमुख गोंधळी हा चांगला बहुरूपी असतो. रसिकांतून बक्षीस, बिदागी मिळाल्यावर गोंधळी हाताच्या हालचाली करून सांकेतिक भाषेत त्याचे नाव सांगतो व मंचावरील साथीदार त्याच्या इशाऱ्याचा अर्थ लावून नाव उच्चारतो. या भाषेला 'करपालवी' (करपल्लवी) असे म्हणतात. या भाषेविषयी लोकांमध्ये कुतुहल असते या करपालवी सांकेतिक भाषेत ३६ अक्षरांना विशिष्ट खुणांना दर्शविले जाते."[९]

Research Hub International Journal

गोंधळातील कथागीते गतीशील असतात. पांरपरिक चालीत, खड्या आवाजात, कथेतील प्रसंगानुसार आपल्या आवाजात, गीताच्या चालीत बदल करीत गोंधळी कथा सादर करीत असतो. गोंधळातील उत्तररंगात कथागीत सादर करण्याची शैली चित्तवेधक असते.

गीताला संवादाची आणि अभिनयाची जोड देत देत गोंधळी कथेचा विस्तार करीत असतो. पौराणिक कथाभागावर आधारित कथागीतातील घटना, प्रसंग, अनुभव अधिक स्पष्ट करण्यासाठी लौकिक जीवनातील घटना, प्रसंग आणि अनुभव यांचा औचित्यपूर्ण उपयोग गोंधळी आपल्या सादरीकरणातून करीत असतो. त्यामुळे अलौकिकत्वाचे लौकिकीकरण होऊन प्रेक्षकांना कथाभाग आपला वाटतो. त्याची कथागीते प्रामुख्याने सुखात्म असतात सुष्ट आणि दुष्ट यांच्यातील संघर्ष वर्णन करून शेवटी सुष्टांचा विजय त्यांच्या कथागीतात दाखविलेला असतो. मुख्य कथासूत्राभोवती अनेक उपकथा जोडल्या असल्यामुळे त्याचे कथागीत 'आख्यान'रूप धारण करतांना दिसते.



**गोंधळात सर्व पात्रांसह विदूषकाच्या वेगळे महत्त्व आहे. विनोदी कोट्यांसह वेडा वाकडा अंगविक्षेप आणि विनोदी संवादातून तो प्रेक्षकांना सतत हसविण्याचा प्रयत्न करीत असतो. कधी शाहिराच्या सुरात सुर मिसळून गाण्याचाही प्रयत्न करतो.**

उत्तररंगात सादर करण्यात येणाऱ्या आख्यानाचे विषय पौराणिक किंवा लौकिक अशा दोन्ही प्रकारचे असू शकतात. आख्यानात प्रसंगानुरूप काही विनोदी किस्सेही सांगितले जातात. गोंधळी आपल्या आख्यानाचे सादरीकरण रामायण, महाभारत, आणि काही पुराणांच्या आधारे करीत असले तरी जाभुळ आख्यान, घटोत्कच वध, अभिमन्यू वध, अशीही अनेक स्वतंत्र आख्याने ते सादर करीत असतात. लोकपरंपरेने चालत आलेली कथासूत्रेच गोंधळी सादर करतात. काही स्थानिक संदर्भ असलेल्या कथाही सादर केल्या जातात. या आख्यानांची प्रेरणा भक्तीची असते तसेच त्यातून उद्‌बोधनही केले जाते.

**गोंधळ लोकनाट्याची सद्यःस्थिती :**

पूर्व विदर्भात सादर होणारा गोंधळ धार्मिकतेकडून आता सामाजिकतेकडे येऊ लागला आहे. केवळ पौराणिक विषयांमध्ये मर्यादित न राहता गोंधळाने विविध सामाजिक विषयांना सुद्धा आत्मसात केले आहे.

त्याचबरोबर या माध्यमातून महान लोकांचे विचारधन सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहचविण्याचे कार्यही गोंधळातून पूर्ण केले जात असल्याची माहिती मिळते. साधारण २० ते २५ वर्षापूर्वीच्या परिस्थितीच्या तुलनेत निश्चितच प्रयोगांची आणि गोंधळाच्या मंडळांची संख्या कमी झाली आहे. या कलेला आपले सर्वस्व मानून, आपले दैनंदिन काम सांभाळून काही लोककलावंत कोणत्याही शासकीय मोबदल्याच्या अपेक्षेशिवाय या कलेची उपासना आणि जोपासना करीत असल्याचे दिसते

भंडारा जिल्ह्यातील लाखनी तालुक्यातील गोंदी/देवरी येथील गोंधळ शाहीर श्री. परसराम मेश्राम ४५ वर्षाचे असून साधारणपणे गेल्या ३० वर्षापासून या व्यवसायात आहेत. त्यांचे वडील महादेव मेश्राम हे त्या काळातील प्रसिद्ध गोंधळी आणि डहाका वादक होते. आपल्या वडीलांपासून प्रेरणा घेऊन श्री. परसराम मेश्राम यांनी या कलेला आत्मसात केले. दरवर्षी साधारण ५० कार्यक्रम ते या परिसरामध्ये सादर करीत असतात अशी माहिती त्यांनी दिली.

श्री. परसराम मेश्राम हे गोंधळाचे शाहीर असून आपल्या प्रयोग सादरीकरणात ते अनेक नवे प्रयोग घडवून आणतात. या गोंधळाच्या कार्यक्रमाला उपस्थित राहणारा वर्ग मोजकाच असतो आणि त्यांच्या आवडीनिवडीनुसार प्रयोग सादर करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सागितले. यासाठी आपल्या गोंधळात कधी चित्रपट गीते, भावगीते, भजन इत्यादी सादर करावे लागतात. या सोबतच गोंधळात भीमगीतांचीही फर्माईश होत असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांनी रचलेले आणि आपल्या प्रयोगात अनेकदा त्यांनी सादर केलेले पुढील भीमगीत पाहू.

" दलितांसाठी भीमरावाने प्राण पणाला लावले
भल्या भल्यांच्या झुकवूनी माना घुट घुट पाणी पाजले ।।
दलितांवर बघुनीया लई अत्याचार
भीमाने मनामध्ये केला विचार
लई कष्टाने शिकून शाळा
जिद्दीने भीमबाबा ब्यॅलिस्टर झाला ।।
मानवतेचा अभ्यास करूनी भीम पुढे सरसावले
दलितांसाठी भीमरावाने प्राण पणाला लावले ।।
भीमाने धर्मग्रंथ अभ्यास केले
घेऊनीया कोट भीम दिल्लीला गेले
जातीयतेचे वर्णन केले
कोर्टात भीमबाबा गर्जून बोले
मनुस्मृती पाहून ग्रंथ समस्त भीमाने जाळले
दलितांसाठी भीमरावाने प्राण पणाला लावले ।।
संविधान लिहून बघा बाबा भीमाने
भल्या भल्या नेत्यांची झुकवली माने
लिहून कलमा साक्षर केले
भारताला संविधान अनुदान दिले
भारतरत्न म्हणुनी भीमाला उत्तमाने गौरविले

दलितांसाठी भीमरावाने प्राण पणाला लावले ।।”

गोंधळाचे मूळ स्वरूप धार्मिक अथवा विधिपर असले तरी आजच्या काळात ही कला इतक्या मर्यादेत राखून ठेवणे अशक्य झाले आहे. आजच्या काळातील परिस्थिती वेगळी आहे, सामाजिक संदर्भ वेगळे आहेत. म्हणूनच पूर्व विदर्भात गोंधळाचे स्वरूप पूर्वीपेक्षा निश्चितच बदललेले असल्याचे आणि सामाजिकतेकडे अधिक झुकले असल्याचे दिसते.

या कलावंतांना साधारण पूर्ण मंडळाला १ हजार ते ३ हजार रूपये एवढे मानधन मिळत असल्याचे त्यांनी सांगितले. गोंधळाच्या कार्यक्रमासाठी मिळणारे मानधन अगदी कमी असले, कमी पैशांबद्दल समाधान वाटत नसले तरी आपली कला, आपले सादरीकरण, आपला प्रयोग पाहायला अनेक लोक येतात, एक कलावंत म्हणून आपल्याला ओळखले जाते, आपली कला लोकांना आवडते या गोष्टीचे समाधान जवळपास प्रत्येकच कलावंताला वाटते आहे. या बाबतीत कलावंतांना वाटणारे समाधान सारखेच आहे असेही म्हणता येऊ शकते.

झाडीपट्टीतील लोकनाट्यांना विशेष नेपथ्याची आवश्यकता नसते. मागच्या बाजूला केवळ एक पडदा असला की त्यांचे काम भागते. रंगमंचावर फारशी सजावटीचीही आवश्यकता नसते. प्रयोगाच्या सादरीकरणासाठी पुरेशी व्यवस्था नसली तरी फारसा काही फरक पडत नाही. रंगमंचाच्या बाबतीत, नेपथ्याच्या बाबतीत कलावंतांना अनेकदा काही साधनांचा अभाव जाणवतो. मात्र हे कलावंत आपल्या कलेशी इतके प्रमाणिक असतात की बाह्य साधनांना ते फारसे महत्त्व देत नाही. जेवढे आहे आणि जसे आहे तेवढ्यामध्येच उत्कृष्ट कार्यक्रम पार पाडण्याचे कौशल्य या कलावंतांमध्ये असते.

गोंदिया जिल्ह्यातील ताडगाव येथील गोंधळ शाहीर श्री. देवाजी टांगसू कोल्हे यांनी सांगितले की, व्यसनाधिनता, स्त्री भृण हत्या, शिक्षणाचा प्रसार इत्यादी विषयावर आधारित गीते गोंधळात सादर केली जातात. अशा नवीन विषयासंबंधी प्रेक्षकांना उत्सुकता लागून असते. या प्रदेशात विविध समस्यांच्या बाबतीत समाजाला जागरूक करण्याचे कार्य गोंधळ या लोकनाट्यातून केले जात आहे. ग्रामीण, अशिक्षित लोकांपुढे गीताच्या माध्यमातून मांडण्यात येणाऱ्या या विविध समस्यांच्या वर्णनातून त्यांची भयावहता, त्यांचे होणारे अनिष्ट परिणाम लोकांच्या ध्यानात येण्याला मोलाची मदत होत असते.

सध्याच्या प्रसारमाध्यमांच्या काळात अगदी खेडोपाडी टी.व्ही., कम्प्युटर, मोबाईल पोहचला आहे. या साधनांच्या द्वारे लोकांची मनोरंजनाची भूक भागविली जाते आहे. आज ग्रामीण भागातही अशा प्रकारचे चित्र निर्माण झाल्याने पारंपरिक पद्धतीने चालत आलेल्या लोकनाट्यांशी नवी पिढी जरा अंतर ठेवूनच वागतांना दिसून येते. या पारंपरिक अशा लोकनाट्यांबद्दल त्यांना कोणत्याही प्रकारची आवड वा उत्सुकता वाटेनाशी झाली आहे. नव्या पिढीतील युवकांनी जर ही कला जोपासली नाही तर निश्चितपणे गोंधळ या लोकनाट्याचे भवितव्य अंधारमय असल्याची भावना अनेक कलावत व्यक्त करतात. तसेच या प्राचीन अशा लोकनाट्याच्या संवर्धनासाठी शासनाची उदासीन भूमिका सुद्धा कारणीभूत असल्याचे अनेकांचे म्हणणे आहे. या लोकनाट्यांना सुस्थिती प्राप्त करून देण्यासाठी शासकीय पातळीवर प्रयत्न केले जात नसल्याची खंत गोंधळ कलावंत व्यक्त करतात.



Research Hub International Journal

पूर्व विदर्भाच्या लोकजीवनात आणि लोकपरंपरेत, लोकधर्मात आणि देवधर्मात मोलाचे स्थान असलेला गोंधळ हा आदिशक्तीच्या उपासनेचा आणि पूर्वजांच्या पराक्रमाचे स्मरण करून देणारा लोककलाप्रकार आहे. आजच्या बदलत्या काळात आख्याने आणि पोवाडे यांचे कौतुक राहिले नाही. गोंधळ्यांनी मानवी जीवनात असणाऱ्या विनोदाला महत्त्वाचे स्थान देऊन त्याचा समावेश आपल्या गोंधळात केला. कोणताही कलावंत हा त्या त्या काळाचे प्रतिनिधित्व करीत असतो. या कलावंतांच्या कलेतून, गीतांतून, कोट्यांतून, प्रसंगातून प्रादेशिक बोलीभाषेचा, रीतीरिवाजांचा आविष्कार होतांना दिसतो. सोबतच नवनवीन सामाजिक विषयांवर, समस्यांवर भाष्य करून सर्वसामान्यांना या बाबतीत जागरूक करण्याचे कार्यही या लोकनाट्यांतून आजच्या घडीला होतांना दिसून येतो. जोवर गोंधळाला कुलाचाराची प्रतिष्ठा आहे, लोकांच्या मनात भक्तीभाव आहे तोवर गोंधळाचे मराठी लोकधर्मातील अस्तित्व कायम राहील असे म्हणणे गैर ठरणार नाही.

**निष्कर्ष :**

१. गोंधळ हे एक प्राचीन विधिनाट्य असून प्राचीन काळी कुलाचार म्हणून पाळला जात असे.
२. गोंधळ हे लोकनाट्य मौखिक परंपरेने चालत आलेले असल्याचे दिसून येते.
३. गोंधळाची संहिता अलिखित असल्याने कालसापेक्ष आणि स्थलसापेक्ष त्याच्या रचनेत बदल करण्याचे स्वातंत्र्य कलावंत घेत असल्याचे दिसते.
४. गोंधळाचे स्वरूप कथागीतात्मक आणि गद्यपद्यमिश्रित असल्याचे दिसून येते.
५. सध्याच्या काळात पौराणिक विषयांसोबतच धार्मिक विषय, सामाजिक विषय, सामाजिक समस्या असेही विषय गोंधळातून सादर केले जात असल्याचे दिसते.
६. गोंधळाची संहिता अलिखित असल्याने कलावंताच्या बुद्धिचातुर्याला भरपूर वाव मिळत असल्याचे दिसून येते.

**संदर्भ ग्रंथ :**

१. डॉ. सुरेश पाटील, प्रा. सुनंदा पाटील, डॉ. सुधीर कोठावदे, 'लोकसाहित्य', य.च.म. मु.वि., नाशिक, २००२, पृष्ठ ९१
२. डॉ. शरद व्यवहारे, लोकसंस्कृतीचा अंत:प्रवाह, प्रतिमा प्रकाशन, पुणे, १९९९, पृष्ठ ३६
३. डॉ. पु. मा. काळभूत, लोकनाट्य : उद्‌गम आणि विकास, विजय प्रकाशन, नागपूर, १९९७, पृष्ठ ४६
४. डॉ. शरद व्यवहारे, उ. नि., पृष्ठ ३८
५. डॉ. पु. मा. काळभूत, उ. नि., पृष्ठ ४८
६. डॉ. शरद व्यवहारे, उ. नि., पृष्ठ ४०
७. डॉ. पु. मा. काळभूत, उ. नि., पृष्ठ ४९
८. डॉ. शरद व्यवहारे, उ. नि., पृष्ठ ४०
९. डॉ. शरद व्यवहारे, उ. नि., पृष्ठ ४२